दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990
लातूर वर्ष ४ थे अंक ०८ वा मंगळवार दि.०४ जून २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB, legrand, HAVELLS, INDOASIAN, Finolex, KOLORS, USHA, PHILIPS, GreatWhite, SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

# आज लोकसभा निवडणूक मतमोजणीसाठी लातूर प्रशासन सज्ज

## मतमोजणी केंद्रात मोबाईल, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणण्यास सक्त मनाई

लातूर : - लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी ४ जून रोजी बार्शी रोडवरील शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन येथील मतमोजणी केंद्रात होणार आहे. यासाठी लातूर निवडणूक प्रशासन सज्ज झाले आहे. या अनुषंगाने मतमोजणी केंद्रातील तयारी पूर्ण झाली असून या परिसरात कडक पोलीस बंदोबस्त राहणार आहे. तसेच उमेदवार, उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी, मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना मतमोजणी केंद्रामध्ये मोबाईल व इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक वस्तू घेवून जाण्यास मनाई करण्यात आली आहे. प्रवेशद्वारावर याबाबतची तपासणी करूनच मतमोजणी केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्यासोबत १७ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी मतमोजणीचे कामकाज पाहणार आहेत. तसेच मतमोजणीसाठी भारत निवडणूक आयोगाने मतमोजणी निरीक्षक म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेतील निरंजन कुमार आणि सागर चक्रबर्ती या दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती केली असून दोघेही लातूर येथे दाखल झाले आहेत. मतदान यंत्रातील (ईव्हीएम) मतमोजणी केंद्रावर प्रत्येक विधानसभा क्षेत्रासाठी स्वतंत्र मतमोजणी कक्ष तयार करण्यात आला असून प्रत्येक कक्षामध्ये १४ टेबलवर मतमोजणीची कार्यवाही होईल. तसेच टपाली मतमोजणीसाठी स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आला असून १० टेबलवर टपाली मतमोजणी होईल. सकाळी ८ वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या समक्ष टपाली मतमोजणीला सुरुवात होईल. त्यांनतर सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या समक्ष संबंधित विधानसभा क्षेत्रातील मतदान यंत्रावरील मतमोजणीला सुरुवात होईल. प्रत्येक टेबलवर उमेदवारांनी नियुक्त केलेल्या मतमोजणी प्रतिनिधींना त्या टेबलवर कोणकोणत्या मतदान केंद्रावरील मतमोजणी होणार आहे, याबाबत माहिती देणारे फलक मतमोजणी कक्षात लावण्यात आले आहेत. प्रत्येक टेबलवर एक मायक्रो ऑब्झर्व्हर म्हणजे सूक्ष्म निरीक्षक, मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहाय्यक आणि एक शिपाई असे अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच प्रत्येक कक्षामध्ये दोन रो ऑफिसर राहतील. सैनिक मतदारांच्या मतपत्रिका छाननीसाठी स्थापित ईटीपीबीएमएस कक्ष, एनकोअर प्रणालीवर माहिती भरण्यासाठी स्थापित कक्ष, सर्व मतमोजणी कक्षातील फेरीनिहाय, उमेदवारनिहाय आकडेवारीची सारणी तयार करण्यासाठी स्थापित टॅब्युलेशन कक्ष आदी विविध कक्षात जवळपास ४५० अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतमोजणीनंतर ईव्हीएम आणि सांविधानिक व असांविधानिक लिफाफे सील करण्यासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय वेगवेगळी पथके गठीत करण्यात आली आहेत. सकाळी ६ वाजता सर्व अधिकारी, कर्मचारी मतमोजणी केंद्रात उपस्थित होणार आहेत. मतमोजणी केंद्र परिसरात प्रवेश करताना पोलिसांकडून प्रत्येक व्यक्तीची तपासणी केली जाणार असून अधिकृत पास असल्याशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच प्रवेशद्वारापासूनच मतमोजणी प्रतिनिधी आणि मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र प्रवेशाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच जागोजागी दिशादर्शक फलक लावून मतमोजणी कक्षातील प्रवेशाबाबत माहिती देण्यात आली आहे.

अशा राहतील मतमोजणी फेऱ्या

मतदान यंत्रातील मतमोजणीसाठी लातूर लोकसभा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या सहा विधानसभा क्षेत्रनिहाय मतमोजणी फेऱ्यामध्ये सर्वाधिक २८ मतमोजणी फेऱ्या लातूर शहर विधानसभा मतदारसंघात




होतील. अहमदपूर विधानसभा मतदारसंघात २७, लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात २६, निलंगा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात २५ आणि उदगीर व लोहा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात प्रत्येकी २४ मतमोजणी फेऱ्या होणार आहेत. तसेच टपाली मतमोजणीची १ फेरी होणार आहे. एकूण लोकसभा मतदारसंघाचा विचार करता मतदान यंत्रातील मतमोजणीच्या २८ आणि टपाली मतमोजणीची १ फेरी झाल्यानंतर अंतिम निकाल घोषित केला जाईल. मतदान यंत्रावरील प्रत्येक फेरीला अंदाजे २० मिनिटे ते ३० मिनिटे लागण्याची शक्यता आहे. मतमोजणी केंद्र परिसरात स्वतंत्र मिडिया सेंटर तयार करण्यात आले असून भारत निवडणूक आयोगाकडून प्राधिकरपत्र (पासेस) दिलेल्या प्रसारमाध्यम प्रतिनिधींना याठिकाणी प्रवेश दिला जाणार आहे. प्रत्येक फेरीचा उमेदवारनिहाय मतांची आकडेवारी याठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी दोन स्वतंत्र अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. शासकीय महिला तंत्रनिकेतनच्या पूर्वेकडील बाजूच्या प्रवेशद्वारातून प्रसारमाध्यम प्रतिनिधींना प्रवेश देण्यात येणार आहे. तसेच जनतेसाठी मतमोजणी केंद्राबाहेरील ध्वनिक्षेपकाद्वारे फेरीनिहाय उमेदवारांना मिळालेल्या मतांची माहिती दिली जाणार आहे.

मोबाईल व इलेक्ट्रॉनिक वस्तू घेवून येण्यास मनाई

मतमोजणी केंद्रात मोबाईल, कॅमेरा, लॅपटॉप, आयपॅड, तसेच इतर कोणतीही इलेक्ट्रॉनिक वस्तु नेण्यास मनाई करण्यात आला आहे. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनासुध्दा केवळ मिडीया सेंटरमध्येच मोबाईलचा वापर करता येईल. प्रत्यक्ष मतमोजणी केंद्रात जातांना मोबाईल मिडीया सेंटर येथे जमा करावा लागेल.

मतमोजणी केंद्र परिसरात तगडा बंदोबस्त

मतमोजणी केंद्राच्या परिसरात सुरक्षेच्या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तगडा बंदोबस्त लावण्यात आला आहे. केंद्रीय राखील पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल आणि लातूर जिल्हा पोलीस आणि गृहरक्षक दलातील जवानांचा यामध्ये समावेश राहणार आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या नेतृत्वात ६ पोलीस उपाधीक्षक, १३ पोलीस निरीक्षक, ४८ सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, ४६० पोलीस जवान, दंगा विरोधी दलाच्या ३ तुकड्या, शीघ्र कृती दलाची १ तुकडी, गृहरक्षक दलाचे ३०० जवान यांच्यासह राज्य राखीव पोलीस दल आणि केंद्रीय पोलीस दलाची तुकडी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आली आहे.

मतमोजणी केंदाच्या २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

लातूर लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी ४ जून, २०२४ रोजी शासकीय निवासी महिला तंत्र निकेतन, बार्शी रोड, लातूर येथे सकाळी ८ पासून सुरु होणार आहे. या मतमोजणी केंद्राच्या २०० मीटर परिसरात ४ जून २०२४ रोजी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

# राज्यातील फोडाफोडीचे राजकारण जनतेला रुचले नाही

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ४०० पार अशी घोषणा केली होती. त्या घोषणेला अनुकूल एक्झिट पोल मध्येही दिसते आहे. मोदीजींचे सरकार केंद्रात येईल असा विश्वास आहेच, जनतेनेही दहा वर्षात त्यांनी केलेल्या कामावर विश्वास दाखवला आहे. मात्र राज्यातील महायुतीवर जनतेने नाराजी दाखवलेली दिसते आहे. राज्यातील जनतेला फोडाफोडीचे राजकारण पटलेले दिसत नसल्याचे वक्तव्य एकनाथ खडसे यांनी केले आहे.अजित पवारांची राष्ट्रवादी, शिंदे सेनेवर काय म्हणाले? शरद पवार यांच्या पक्षाला दहा पैकी सहा ते आठ जागा येताना दिसताय म्हणजे जनतेने शरद पवारांच्या पक्षावर विश्वास ठेवलेला आहे.अजित



दादांच्या राष्ट्रवादीवर लोकांनी विश्वास ठेवल्याचे दिसत नाही असेही खडसे स्पष्ट बोलले. तर उद्धव ठाकरेंचे दुसऱ्या क्रमांकाचे खासदार निवडून येतील असे दिसते आहे. म्हणजे एकनाथ शिंदे यांनी जे फोडाफोडीचे राजकारण करुन शिवसेना ताब्यात घेतली ते लोकांना मान्य झालेले दिसत नाही. लोकांची सहानुभूती ठाकरेंना मिळालेली आहे असेही खडसे म्हणाले.

राष्ट्रीय मुद्दे अधिक प्रभावी ठरले एक्झिट पोल जाहीर झाल्यानंतर खडसेंनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळेस नरेंद्र मोदी यांनी ४०० पारची घोषणा दिली होती. ते चारशे पर्यंत जातील असे वाटले नव्हते. मात्र त्यांनी दहा वर्षात केलेल्या कामांवर विश्वास जनतेने दाखवला आहे. काही नकारात्मक गोष्टीही आहे, शेतकरी नाराज आहेत, बरोजगारीचाही विषय आहे. पंरतु याहीपेक्षा राष्ट्रीय मुद्दे अधिक प्रभावी ठरल्याचे दिसते आहे. तर महाराष्ट्राचा विचार करता युतीपेक्षा महाविकासआघाडीला जनतेने पसंती दिली आहे. जनतेला राज्यातील फोडाफोडीचे राजकारण मान्य झालेले नाही असे खडसे म्हणाले.

# कंत्राटी प्राध्यापक भरतीसंदर्भात नेमण्यात आली चौकशी समिती

सोलापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठातील सहायक प्राध्यापक (कंत्राटी) पदाच्या भरतीमध्ये अनिश्चितता असून, याबाबत करण्यात आलेल्या तक्रारीवरून कुलसचिव योगिनी घारे यांनी चौकशी समिती नियुक्त केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करिता विद्यापीठांमध्ये जी सहायक प्राध्यापक (कंत्राटी) पदासाठी भरती करण्यात आली आहे, मात्र त्यामध्ये अनिश्चितता – दिसून येत असल्याने त्याची चौकशी व्हावी, अशी मागणी सिनेट सदस्य गणेश डोंगरे यांनी केली होती. याबाबत डोंगरे यांनी कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांना मार्च २०२४ मध्ये निवेदन दिले होते. कुलगुरूंनी याची दखल घेऊनचौकशी करण्याचे आश्वासन दिले होते.

तक्रारीची दखल घेऊन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०३ अन्वये कंत्राटी सहायक प्राध्यापक पदांच्या पदभरतीसंदर्भात पाच सदस्यांची चौकशी समिती नेमण्यात आली आहे. नियुक्त करण्यात आलेल्या समितीमध्ये अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) चे कुलगुरू डॉ. विजय फुलारी, मुंबई विद्यापीठातील पदार्थ विज्ञान विभाग प्रमुख डॉ. वैशाली बंबोले, सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगावचे प्राचार्य डॉ. एस.डी. नवले, डी.बी.एफ. दयानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही.पी. उबाळे, कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शीचे प्रा. डॉ. व्ही.पी. शिखरे यांची नियुक्ती झाली आहे. आलेल्या तक्रारीवरून कुलगुरूंच्या आदेशावरून चौकशी समिती गठित करण्यात आली आहे. समितीमध्ये पदाने खूप मोठी माणसे आहेत. समितीची बैठक होऊन, त्यात भरतीसंदर्भात अहवाल तयार होईल.

त्यानंतर अहवालावरून पुढील योग्य ती कार्यवाही होईल.असे कुलसचिव योगिनी घारे म्हणाल्या.

# भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हा अंतर्गत युवक श्रामणेर शिबीर संपन्न

नालंदा बुद्ध विहार बोनसारी गांव (एमआयडीसी) येथे समाज सेवक, वंचित चे कार्यकर्ते : सुनिल भोले यांचे तर्फे पुज्य भदन्त विशुद्ध बोधी व त्यांच्या भिक्खु संघास भोजन व चिवरदान करण्यात आले.






नवी मुंबई / के. एच. हनवते :– भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हा शाखेच्या वतीने युवक श्रामणेर शिबीराचे आयोजन पंचशील बुद्ध विहार तुर्भे या ठिकाणी दिनांक : २९ जुन ते ०२/जुन /२०२४ या दरम्यान पाच दिवसीय युवक श्रामणेर शिबीराचे आयोजन करण्यात आले होते विविध शाखेच्या वतीने संघाला भोजनदान व फलाहार करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले त्याचाच एक भाग म्हणून वार्ड क्र. ८० (एमआयडीसी) येथे दिनांक : ०१/जुन/२०२४ रोजी नालंदा बुद्ध विहार – बोनसारी गांव शाखेच्या वतीने श्रामणेर संघाला भोजनदान करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते या युवक श्रामणेर भिक्खु संघाला भोजनदान व चिवरदान समाजसेवक, वंचित चे कार्यकर्ते : सुनिल भोले यांच्या सह परिवाराच्या वतीने करण्यात आले तर या कार्यक्रमाला उपस्थित म्हणून भारतीय बौद्ध महासभा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा : स्वाती ताई शिंदे तसेच मुंबई प्रदेश चे महादेव गायकवाड गुरूजी यांच्या सह नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष : जयवंत लव्हांडे गुरूजी, सरचिटणीस : जीवन वाढते गुरूजी, कोषाध्यक्ष : प्रकाश माने गुरूजी, संस्कार सचिव : चंद्रकांत माने गुरूजी व तसेच कार्यालयीन सचिव : दत्तात्रय हराळ गुरुजी, केंद्रीय शिक्षक, मेजर समता सैनिक दल : अनिल शिंदे गुरूजी, हिशोब तपासनीस : आनंदबोधी निकाळजे गुरूजी, बौद्धाचार्य तथा पत्रकार : कल्याणराव हनवते, अँड. जानकी आनंद, यांच्या सह समता सैनिक दलाचे सैनिक व जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व श्रामणेर संघाला सेवा देण्यासाठी नालंदा बुद्ध विहार – बोनसारी गांव शाखेच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते तथा वंचित बहुजन आघाडीचे बेलापूर तालुका मा. सचिव दिपक गायकवाड, समाजसेवक : सुभाष बलखंडे, खिराजी धापसे, बंडु आवचरमल, तात्याराव गायकवाड, प्रकाश नंद, प्रमोद लोखंडे, तसेच महीला पदाधिकारी म्हणून शाखा अध्यक्षा :– आयुनी. रेखाताई इंगळे, भाग्यश्री बलखंडे, मिरा नंद, जयश्री गायकवाड, अनिता शिंदे, पवित्राबाई वाव्हळ, दिपाली वाव्हळ, शोभाताई धापसे, ज्योती धापसे, पुनम धापसे, कमलबाई धुरंधर, सीमा कांबळे, सविता राजभोज, रेखाताई लोखंडे, कविता सोनवणे, संगीता गायकवाड शांताबाई सोनावणे, पार्वती कांबळे, पार्वती चव्हाण, पुजा लोखंडे मंगलबाई साळवे, राणी आवचरमल इत्यादींनी मेहनत घेऊन सहकार्य केले.

## विधानपरिषद 'शिक्षक-पदवीधर'साठी भाजपकडून शेलार, दराडे, डावखरे यांना उमेदवारी

नवी दिल्ली, : महाराष्ट्रात येत्या २६ जून रोजी ४ पदवीधर व शिक्षक मतदारसंघात निवडणूक होऊ घातली आहे.

या निवडणुकीसाठी भाजपने सोमवारी आपले ३ उमेदवार जाहीर केले. कोकण विभाग पदवीधर मतदारसंघातून विद्यमान आमदार निरंजन डावखरे यांना तर मुंबई विभाग पदवीधरमधून किरण शेलार आणि मुंबई विभाग शिक्षक मतदारसंघातून शिवनाथ दराडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शिक्षक व पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर केली.

यामध्ये मुंबई विभाग पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसेच मुंबई विभाग शिक्षक मतदारसंघ अशा एकूण ४ जागांसाठी २६ जून रोजी निवडणूक होणार आहे.या निवडणुकीसाठी भाजपने जाहीर केलेल्या उमेदवार यादीत कोकण विभाग पदवीधर मतदारसंघातून निरंजन डावखरे, मुंबई विभाग पदवीधरमधून किरण शेलार आणि मुंबई विभाग शिक्षक मतदारसंघातून शिवनाथ दराडे यांच्या नावांचा समावेश आहे. भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीने शिक्कामोर्तब केल्यानंतर पक्ष मुख्यालयातून ही यादी जाहीर करण्यात आली.

लोकसभा निवडणुकीत आपल्या घटक पक्षांना सोबत घेऊन लढलेल्या महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये या विधानपरिषद निवडणुकीत मात्र, समन्वय बिघडला असल्याचे दिसून आले आहे. महायुतीला पाठिंबा देणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कोकण पदवीधर मतदारसंघातून भाजपचा उमेदवार जाहीर होण्यापूर्वीच अभिजीत पानसे यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे महायुतीला मनसेची मनधरणी करावी लागणार आहे.

महाविकास आघाडीतील घटकपक्ष असलेल्या शिवसेना ठाकरे गटाने मुंबई विभाग पदवीधर मतदारसंघातून शिवसेना नेते अनिल परब यांना आणि मुंबई विभाग शिक्षक मतदारसंघातून ज. मो. अभ्यंकर यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे महाविकास आघाडीतही तिढा निर्माण झाला आहे.

## संपादकीय....

# निवडणूक व्यवस्थेत सुधारणांचे आव्हान

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षांनी प्रचार, त्यावरील खर्च, आश्वासने, आरोप-प्रत्यारोप आदी बाबतीत विक्रम प्रस्थापित केले. त्यामुळे निवडणूक आयोगाकडे केलेल्या तक्रारींची संख्याही वाढली. निकाल जाहीर झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयापासून नव्या संसदेत नव्याने काही सुधारणा लागू करण्याबाबत चर्चा होण्याची शक्यता दिसू लागली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक देश-एक निवडणूक यासाठी सर्वांची संमती घेण्यासाठी मंथन सुरू केले जावे, अशी घोषणा पुन्हा केली आहे.

गेल्या लोकसभा निवडणुकीतही मोदी यांनी एक देश- एक निवडणूक हा मुद्दा समोर आणला होता. त्यानंतर मोदी सरकारने यासंदर्भात माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन केली. या समितीने सर्वंकष विचार करून विविध शिफारशींचा समावेश असलेला अहवाल केंद्र सरकारला सादर केला आहे. सामान्य जनतेलाही आता सततच्या निवडणुकांचा कंटाळा आल्याचे दिसून येते. काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांना एक देश-एक निवडणूक ही संकल्पना मान्य नाही. त्यांना अशी भीती वाटते की, जर असे झाले तर पंतप्रधान मोदी आणि त्यांचा भाजप बहुतांश राज्यांत शक्तिशाली होत जाईल. यात मूलभूत प्रश्न असा आहे की, निवडणूक व्यवस्थेला नाक मुरडणारे राजकीय पक्ष स्वतःहून काही सुधारणा घडवून आणणार काय? नवे तंत्रज्ञान, कोट्यवधीचा खर्च, गुन्हेगारांना तिकीट देणे, मतमोजणीच्या व्यवस्थेत सुधारणा घडवून आणणे यासारख्या गोष्टींबद्दल हे पक्ष किती गंभीर आहेत, हा विचार करण्यासारखा मुद्दा आहे.

आता मतदारही दिवसेंदिवस जागरुक होत आहे; मात्र खोटी आश्वासने, प्रचारावरील अफाट खर्च, निवडून आल्यानंतर संबंधित लोकप्रतिनिधींकडून मतदारसंघाकडे केले जाणारे दुर्लक्ष यामुळे मतदार कावल्याचे दिसून येते. हे टाळण्यासाठी काही माजी मुख्य निवडणूक आयुक्तांनी या व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. आचारसंहितेला बगल देऊन कायदे आणि नियमांतील पळवाटांचा आधार घेण्याच्या प्रवृत्तीवर अंकुश लावण्यासाठी केलेल्या या सूचनांवर नव्या संसदेत गंभीरपणे चर्चा होणे अपेक्षित आहे.

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी मुस्लिमांना आरक्षण आणि देशातील संपत्तीवर मुस्लिमांचा सर्वात प्रथम अधिकार यासंदर्भात कथित वक्तव्य केल्याचा मुद्दा भाजपने यावेळी प्रचारात लावून धरला होता. डॉ. सिंग यांनी नंतर त्यावर काही स्पष्टीकरण दिले; मात्र ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि तेव्हाचे कायदामंत्री सलमान खुर्शीद यांनी गेल्या निवडणुकीत मुस्लिमांना ९ टक्के आरक्षण देण्याची घोषणा जाहीररीत्या केली होती. त्यावर राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गे यांनी मौन पाळल्याचे दिसून येते.

या निवडणुकीदरम्यान खूपच चर्चा झालेला आणखी एक विषय म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मंजूर केलेला अंतरिम जामीन. दिल्ली मद्य धोरण घोटाळाप्रकरणी तुरुंगात असलेल्या केजरीवाल यांना त्यामुळे प्रचाराची संधी मिळाली. त्यांनी या काळात दिल्ली, पंजाबसह अन्य राज्यांत मतदारांची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले. नंतर त्यांनी आपल्या जामिनाची मुदत वाढवून मिळण्यासाठी खटपट सुरू केली. आपल्याला तिहार तुरुंगात पुरेशा आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत, असेही त्यांनी प्रचारादरम्यान आम जनतेला सांगितले. आपल्या वृद्ध आई-वडिलांची चौकशी तपास यंत्रणांनी सुरू केल्याचे सांगत त्यांनी मतदारांची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसला त्यांची ही कृती मान्य आहे? याबद्दल त्यांच्याविरुद्ध तक्रार करण्याचे धाडस काँग्रेसने दाखवलेले नाही. या पार्श्वभूमीवर, नव्या निवडणूक सुधारणा, महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवणे आणि समान नागरी कायदा यासारख्या गोष्टी वास्तवात उतरवण्यासाठी व्यापक एकमत बनवणे गरजेचे आहे.

# खरंच, इव्हीएमचा कौल कोणाला?

आपल्या भारत देशात आज ४ जूनला १८व्या लोकसभा निवडणुकीचं निकाल जाहीर होत आहे. देशात एकूण सात टप्प्यामध्ये लोकसभा निवडणूक झाली आहे. मतदान करण्यासाठी आपण इव्हीएमचा वापर केला. या निवडणुकीत इव्हीएम हटाओ देश बचाओचा नारा विरोधकांकडून देण्यात आला होता. कारण ज्या उमेदवाराचा पराभव होतो त्याला असं वाटतं की इव्हीएममुळे आपला पराभव झाला. त्यामुळे प्रत्येक निवणुकीत इव्हीएमचा मुद्दा हा समोर येतच असतो. सर्वाधिक मते मिळालेला उमेदवार निवडून आला, असे जाहीर केले जाते. त्याला इव्हीएमने कौल दिल्याचे समजले जाते. हाच लोकशाहीच्या उत्सवाचा परमोच्च क्षण होय. याबद्दलचा माहितीपूर्ण संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींनी मांडला आहे... संपादक.

मतदानाची मोजणी कशी होत आहे? तर देशात इव्हीएमवरून विरोधक नेहमी आक्रमक होताना पाहायला मिळतात. जर अमेरिका सारख्या देशामध्ये तो हॅक होऊ शकतो तर भारतात का नाही? असा सवाल त्यांचा आहे. त्यामुळे इव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या. अशी त्यांची मागणी आहे. पण हे सुरक्षित मशीन आहे असं निवडणूक आयोग सांगत आलाय. इव्हीएम म्हणजे काय? तर इलेक्ट्रिक वोटर मशीन म्हणजे त्यालाच आपण इव्हीएम म्हणतो. त्याचा प्रस्ताव सर्वात आधी सन १९७७मध्ये मांडण्यात आला. त्यानंतर सन १९७९मध्ये पहिल्यांदा इव्हीएम तयार करण्यात आले. पुढे हळू हळू संपूर्ण देशात इव्हीएमवर मतदानाची प्रक्रिया सुरू झाली. देशात दोन ठिकाणी या मशीन तयार केले जातात. भारत इलेक्ट्रॉनिक लिमिटेड आणि इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या दोन्ही कंपन्या भारत सरकारच्या मालकीच्या आहेत.

मतमोजणी- मतदान झाल्यानंतर इव्हीएमला सील मारून त्याला एका स्टोअर रूममध्ये ठेवण्यात येते. त्याच्या सुरक्षेसाठी केंद्रीय दलाचे जवान चोवीस तास तैनात असतात. जेव्हा निकालाचा दिवस असतो, तेव्हा ती मशीन स्टोअर रूममधून बाहेर काढण्यात येते. मतमोजणी करत असताना एका वेळी फक्त १४ मशीनचीच मोजणी केली जाते. त्यासाठी १४ टेबलची व्यवस्था करण्यात येते. प्रत्येक टेबलवर एक निवडणूक अधिकारी, उमेदवार आणि त्या त्या पक्षाचा एक सदस्य असतो. मतमोजणी सुरू असताना तो या संपूर्ण प्रक्रियेवर नजर ठेवतो. उमेदवाराने इव्हीएमला हात लावू नये यासाठी मध्ये एक बरिकेट्स ठेवण्यात येतो. सर्वात आधी पोस्टल मतांची मोजणी होते. त्यानंतर अर्ध्या तासाने इव्हीएम मतांची मोजणी होते. ही मोजणी सुरू करण्याआधी त्याच्या सीलची तपासणी केले जाते. मशीनसोबत कोणतीही छेडछाड तर झाली नाही ना? याची तपासणी मतमोजणी अधिकारी करून घेतो. त्यानंतरच मतमोजणीसाठी ते मशीन सुरू करण्यात येते. लगेच रिझल्ट बटन दाबलं जाते. कोणत्या उमेदवाराला किती मते पडली याची आकडेवारी समोर येते. त्यांनतर ही आकडेवारी फॉर्म क्रमांक १७ सीमध्ये नोंदवली जाते. त्यावर जो कोणी उमेदवाराच्या बाजूने मतमोजणीसाठी उपस्थित आहे, त्याची सही घेण्यात येते. त्यानंतर त्या फॉर्मला रिटर्निंग ऑफिसर्सकडे पाठवण्यात येते. आलेल्या निकालाला एका ब्लॅक अँड व्हाईट बोर्डवरती लिहण्यात येते. प्रत्येक फेरीत होणाऱ्या मतमोजणीची आकडेवारी राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्याला सांगण्यात येते. ही प्रक्रिया जोपर्यंत मतमोजणी पूर्ण होत नाही तोपर्यंत चालत राहते. शेवटी ज्या उमेदवाराला जास्त मते मिळाली अशा उमेदवाराला विजयाचं प्रमाणपत्र देऊन निवडणूक अधिकारी त्याला विजय घोषित करतात.

या निवडणुकीत इव्हीएम हटाओ देश बचाओचा नारा विरोधकांकडून देण्यात आला होता. कारण ज्या उमेदवाराचा पराभव होतो त्याला असं वाटतं की इव्हीएममुळे आपला पराभव झाला. त्यामुळे प्रत्येक निवणुकीत इव्हीएमचा मुद्दा हा समोर येतच असतो. सर्वाधिक मते मिळालेला उमेदवार निवडून आला, असे जाहीर केले जाते. त्याला इव्हीएमने कौल दिल्याचे समजले जाते. हाच लोकशाहीच्या उत्सवाचा परमोच्च क्षण होय. आज निकालाची उत्सुकता शिगेला पोहोचते. लोक निकाल ऐकण्यासाठी रेडिओला कान लावून, पाहण्यासाठी टिव्हीकडे डोळे फाडफाडून आणि प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी तहसील कार्यालयासमोर ठाण मांडून बसतील. निवडून येणारा उमेदवार, त्याच्या पार्टीतील नेते आणि समर्थक गुलाल उधळून होळी खेळत प्रतिस्पर्धकांना, पराजित उमेदवारांना वाकुल्या दावतील. दोन बोटे वर करून विजयाची खून दाखत विजयी मिरवणूकीद्वारे थाटामाटात मिरवतील. चला तर सज्ज होउया.

!! विजयी उमेदवाराचे हार्दिक हार्दिक अभिनंदन जी !!


*********

- संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

# नवे सरकार, नव्याने अपेक्षा!

गेले दीड महिने सुरू असलेल्या २०२४ साठीच्या लोकसभा निवडणुकांचे निकाल समजायला काही तासांचाच अवधी शिल्लक राहिलेला आहे. त्यानंतर सत्तेवर येणाऱ्या नव्या सरकारने लोकांसाठी काय करणे अपेक्षित आहे?

४ जून २०२४ रोजी लोकसभा निवडणुकीची मतगणना होऊन जून अखेरपर्यंत नवे सरकार तयार होईल. 'रालोआ' आघाडीचे सरकार येईल की 'इंडिया' आघाडीचे याबाबत कमालीची उत्सुकता व चर्चा सुरू आहेत. भारतातच नव्हे तर सर्व जगभराचे लक्ष याकडे लागले आहे. हातातील सत्ता जाऊ देणे किती धोक्याचे आहे आणि गेलेली सत्ता पुन्हा मिळवणे किती आवश्यक आहे, असा तो संघर्ष आहे. राजकीय बदल काहीही होत असले तरी लोकजीवनाचे काही आर्थिक प्रश्न जुन्या धोरणांमधून एकत्रित होतात आणि ते प्रश्न सुटावेत हे निकडीचे होऊन जाते. म्हणून जनतेच्या नव्या अपेक्षा नसतात, तर त्याच अपेक्षा नव्याने व्यक्त होतात. काही प्रश्न नागरिकांतर्फे, काही सामाजिक संघटनांतर्फे तर काही उद्योजकांच्या संस्था-संघटनांतर्फे उपस्थित केले जातात. आजच्या परिस्थितीत अनुभव असा आहे की, सरकार उद्योजकांच्या सूचनांकडे लवकर लक्ष देते. परिणामी प्रत्यक्ष जीवनातील (विशेषत: ग्रामीण) प्रश्न पुन्हा कायम राहतात. सर्वच विश्लेषकांनी म्हटले आहे की, २०२४ च्या लोकसभा निवडणुकांच्या दरम्यान १४२ कोटी लोकसंख्येच्या दीर्घकालीन विकास-प्रश्नांची, दोन्ही आर्थिक प्रणाली, धोरणे, सार्वजनिक-खासगी क्षेत्रांचे समतोल, अंमलबजावणीचे प्रश्न यांची चर्चा होण्याऐवजी एकमेकांची कुळे खोदणे, पक्ष फोडणे व त्यातील भ्रष्टाचार याचीच चर्चा प्रत्येक मतदान चरणामध्ये होत गेली व होत आहे. त्यावरून आपल्या लोकशाहीचा पोत (दर्जा) सुधारण्यास बराच काळ लागेल असे दिसते. आपण इतरांपेक्षा बरे



आहोत हा समाधानाचा मुद्दा होऊ शकत नाही. राजकीय उद्ध्वस्तीकरणाचे परिणाम आर्थिक अनिश्चितता व धार्मिक- सामाजिक- सांस्कृतिक असामंजस्य निर्माण होण्यात दिसून येतात. जर सध्याच्या तरुण पिढीने यालाच आदर्श व अनुकरणीय मानले तर भविष्यकाळ कठीण असेल, असे आपण जाणले पाहिजे.

महत्त्वाचे आर्थिक प्रश्न पुढीलप्रमाणे. बेरोजगारी देशात सर्वात मोठी निराशा बेरोजगारीच्या प्रश्नावर आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनांच्या (आयएलओ) इंडिया एम्प्लॉयमेंट रिपोर्ट २०२४ नुसार भारतात श्रम करणाऱ्यांचे लोकसंख्येमधील प्रमाण २०११ मध्ये ५९ होते आणि २०२१ मध्ये ते ६३ झाले. पुढील सुमारे १५ वर्षे हे प्रमाण असेच राहणार आहे असा अंदाज आहे. २०१४ च्या निवडणूक प्रचाराच्या वेळी तरुणांना सांगितले गेले की, दरवर्षी दोन कोटी रोजगार निर्माण केला जाईल. २०२४ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था दरवर्षी सुमारे एक कोटीपेक्षा अधिक रोजगार निर्माण करू शकलेली नाही. त्याच अहवालानुसार रोजगार, शिक्षण आणि प्रशिक्षणातही नसलेल्या तरुणांचे प्रमाण भारतात २०१० पासून २०१९ पर्यंतच्या काळात श्रमबळाच्या सुमारे २९.२ पर्यंत वाढलेले होते. महिला श्रमिकांची स्थिती त्याहून वाईट आहे. उत्पादनवाढीसाठी नवे स्वयंचलित तंत्रज्ञान वापरले जात असल्याने उत्पादन (म्हणजे राष्ट्रीय स्थूल उत्पन्न) वाढते, परंतु त्या प्रमाणात रोजगार वाढत नाही आहे. जे राजकीय पक्ष बेरोजगारीबद्दल विविध प्रकारची अशक्यप्राय आश्वासने देतील त्यांना जनतेनेच विचारावयास हवे की हे कसे शक्य होणार हे सांगा. या बेरोजगारीमुळेच (साहजिकच) प्रत्येक समाजगट म्हणतो की आम्हाला आमच्या प्रमाणात सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण द्या. रोजगार नसल्यामुळे हिंसा, लैंगिक गुन्हे, सामान्य गुन्हेगारी वाढत आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. विकासकामांतील बराचसा रोजगार कंत्राटी असतो, तो अनिश्चिततेची तलवार टांगती ठेवतो. २०२४ च्या निवडणुकीत हा मुद्दा त्या तीव्रतेने चर्चेत आला नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळत नाही. शेतीतील उत्पादन घटक वस्तूचे जसे बियाणे, खते, कीटकनाशके, अवजारे, यंत्रसामग्री, वीज, यांचे दर उद्योजक ठरवतात. शेतकऱ्यांच्या उत्पादित मालांची किंमतही कृषी व्यापार कंपन्या ठरवतात. त्यामुळे शेती क्षेत्र पूर्णपणे उद्योगांच्या हातात अडकले आहे. शेतमालाला किमान हमीभाव द्यावा आणि तसा कायदा करावा, अशी मागणी शेतकऱ्यांच्या संघटना करतात तेव्हा सरकार म्हणते की, असा कायदा करणार नाही! मग खर्च आणि उत्पन्नाचा मेळ न जुळल्यामुळे शेतकरी कर्जे परत करू शकत नाही व आत्महत्या करतो. तरुण शेतकऱ्यांच्या तरुण विधवांना मुलेबाळे सांभाळावी लागतात व शेतीचेही प्रश्न सोडवावे लागतात. या प्रश्नाची जाण व दाहकता २०२४ च्या प्रचारात चर्चेला आली नाही, उपायांची चर्चा तर नव्हतीच. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची १६ मे २०२४ रोजी प्रकाशित २०२२ या वर्षाची आकडेवारी दर्शवते की, त्या वर्षात एकूण ११,२९० शेतकरी आत्महत्या घडून आल्या. त्यापैकी सर्वात जास्त ४,२४८ (३७.६) आत्महत्या उद्योगांत, अब्जोपतींच्या संख्येत आघाडीवर असणाऱ्या महाराष्ट्रात घडून आल्या. त्या आत्महत्या शून्यावर आणण्यासाठी प्रयत्न करणारे आणि त्यासाठी आवश्यक ते संरचनात्मक बदल घडवून आणणारे सरकार ४ जून २०२४ पासून हवे आहे. त्याच २०२२ च्या आकडेवारीत ओडिशा, बिहार, पुडुचेरी, प. बंगाल, उत्तराखंड, त्रिपुरा, मिझोरम, मणिपूर ही अगदी शून्य आत्महत्या असलेली राज्ये, आठ एकआकडी असणारे प्रदेश आहेत. त्यामुळे शून्य शेतकरी आत्महत्या याला कोणी स्वप्न मानू नये. तसे करून दाखवणाऱ्या सरकारची गरज आहे. महाराष्ट्रातील या पराकोटीच्या आत्महत्या सिंचनाच्या प्रदेशात न घडता प्रामुख्याने कोरडवाहू शेती असणाऱ्या विदर्भ-मराठवाड्यात घडत आहेत, हे सांगणे न लगे. निवडणुकीच्या काळातच मराठवाड्यात २७२ आत्महत्या घडून आल्या. हवामान बदलाचा व अवेळी पावसाचा फटका कोरडवाहू प्रदेशांनाच अधिक बसतो. तो शेतकरी बाजार, निसर्ग आणि अपुरे सरकारी साहाय्य या सगळ्यांचाच मार खात आहे.

उत्पन्न विषमता आज जगात दक्षिण आफ्रिका वगळल्यास सगळ्यात जास्त उत्पन्न विषमता (गरीब-श्रीमंत रुंदावणारी दरी) भारतात आहे. का म्हणून? इतर देशांना विषमता नियंत्रणात आणणे बऱ्याच अंशी जमले ते भारत सरकारला का जमले नाही, असा जनतेला पडलेला प्रश्न आहे. ही जर उत्पन्न वितरणाची संरचना झाली असेल तर आपण सकल उत्पन्नाच्या बाबतीत जगात तिसऱ्या नव्हे दुसऱ्या क्रमांकाची महाशक्ती झालो तरी विषमता वाढवणाऱ्या शक्ती अधिक प्रबळ होत जातील. या विषमतेच्या सापळ्यात वर चर्चा केल्याप्रमाणे, ग्रामीण समाज खालच्या उत्पन्न स्तरावर आहे. औद्योगिक वस्तूंकरिता ग्रामीण भागात मागणी कमी आहे, अशी या क्षणी उद्योजक वर्गाची तक्रार आहे. त्यावर उपाय ग्रामीण रोजगार वाढवणे, तो स्थिर करणे व त्याच्या मजुरीत, शेतमालाच्या किमतींमध्ये वाढ करणे महत्त्वाचे व अनिवार्य आहे. याची मुळीच चर्चा निवडणूक पर्वात घडून आली नाही. सार्वजनिक व खासगी विकास क्षेत्रे

आजही जरी सार्वजनिक क्षेत्रामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला बरेच स्थैर्य लाभलेले आहे तरी घिसाडघाईच्या खासगीकरणामुळे आर्थिक क्षेत्रात संभ्रम आणि अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झालेले आहे. 'इंडियन एक्स्प्रेस'ने (१६ मे २०२४) खासगी क्षेत्रातील महत्त्वाच्या मोठ्या कंपन्यांच्या मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांची मते संकलित केली, त्यातले महत्त्वाचे मुद्दे असे : (अ) सरकार प्रकाशित करीत असलेले राष्ट्रीय उत्पन्नाचे अंदाज प्रत्यक्ष परिस्थितीत दिसून येत नाहीत. (ब) सध्या सरकारच्या पायाभूत क्षेत्रातील गुंतवणुकीवर राष्ट्रीय उत्पन्न विकास अवलंबून आहे. त्याचे फायदे खालपर्यंत झिरपायला काही काळ जावा लागेल. पायाभूत क्षेत्रात खासगी क्षेत्राला अपेक्षित भांडवल परतावा आणि धोरणांत सहभाग मिळत नाही, म्हणून खासगी क्षेत्र त्यात भांडवल गुंतवत नाही. (क) मूलभूत पायाभूत सुविधा निर्माण करणे ही सरकारची जबाबदारी आहे आणि सरकारने सार्वजनिक उद्योगांतून, विशेषत: संरक्षण वस्तू उत्पादनातून बाहेर पडावे. (ड) ४६५ कंपन्यांचे सर्वेक्षण असे दाखवते की, नफा थोडा बरा वाढला; परंतु भाववाढीमुळे उत्पादनवाढ मर्यादित झाली आहे. पूर्णच खासगीकरण झाले तर सरकारची स्थिती काय होईल हे लक्षात येते. सरकारला खासगी उद्योगांचेच सर्व ऐकावे लागेल आणि १४२ कोटी लोकसंख्येचा रोजगार, सामाजिक कल्याण याबाबतचे धोरणही खासगी क्षेत्रच सरकारला सुचवेल. परिणामी कोणत्या राजकीय आघाडीजवळ लोकसभेत किती प्रतिनिधी असतील हे कदाचित कमी महत्त्वाचे होऊन जाईल. या सर्व प्रश्नांच्या उत्तरांकरिता अर्थातच ४ जूनची वाट पाहणे आवश्यक आहे.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी आनंदाची बातमी....पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे ज्येष्ठांच्या मदतीकरिता स्वतंत्र कक्ष सुरु




काळाच्या ओघात लहान कुटुंब पद्धतीमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. शिक्षणानंतर मुले नोकरी व्यवसायानिमित्त बाहेरगावी राहण्याचे प्रमाण वाढले आहे. पूर्वी व्यवसाय नोकरी निमित्त मुलांचे बाहेर जाण्याचे प्रमाण कमी असल्याने आई–वडील मुलांसोबतच एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये राहत होते. परंतु अलीकडील काळात आई–वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या समस्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होताना दिसत आहे.

ज्या आई–वडिलांनी लहानाचे मोठे केले आर्थिक विवंचनेतून मुलांचे शिक्षण, संगोपन करून त्यांचे भविष्य घडविले, जे आई वडील उभ्या आयुष्यासाठी आपला आधारवड म्हणून पाठीमागे उभे राहिले. त्याच आई–वडिलांवर पोटच्या मुलांकडून पोरके होण्याची नामुष्की ओढवली जात आहे. जेव्हा स्वतःची मुलेच आपल्या वाईटावर उठून स्वतःच्या घरातून बेदखल करतात तेव्हा आई–वडील व ज्येष्ठांवर दुःखाचा डोंगर कोसळतो.

संपूर्ण आयुष्य मुलांच्या भविष्यासाठी संघर्ष केल्या नंतर आता कुठे शारीरिक व मानसिक निवांतपणा व उर्वरित आयुष्याचा आनंद घेण्याचे दिवस आलेत हे विचार मनाला सुखावून जात असतानाच या सुंदर स्वप्नांचा कडेलोट होऊन स्वतःही केंव्हा दुःखाच्या खाईत येऊन पडतो हे जेष्ठांना लक्षात देखील येत नाही.

आयुष्यभर आत्मसन्मानाने राहणाऱ्या आई–वडिलांवर जेव्हा हतबलता येते तेव्हा आपल्या व्यथा मांडायच्या तर कोणा पुढे हा प्रश्न उभा राहतो. आपल्या पुढील सर्व रस्ते आता बंद झालेत ही दुर्बलतेची जाणीव त्यांच्या मनात तयार होते. समाजात बहुतेक ठिकाणी हीच परिस्थिती दिसत असल्याने यालाच म्हातारपण म्हणतात किंवा आपल्या पूर्व जन्माची कर्माची फळे आहेत हा समज करून जेष्ठ मारून मुटकून अन्याय सहन करत असह्यपणे जीवन जगत असतात. म्हातारपणाचे हे अगतिक जीवन फक्त गरीब ज्येष्ठांच्या नशिबी आहे असे नाही तर समाजातील सर्व स्तरातील जेष्ठांच्या नशिबी कमी अधिक प्रमाणात हा वाईट अनुभव येत असल्याचे निदर्शनास येते.

आयुष्याच्या उतार वयात वृद्धत्व, आजारपण, शारीरिक व्याधी हळूहळू जीवन व्यापून टाकतात, आयुष्यभर ताठ मानेने चालता चालता पाठीचा कणा केव्हा वाकून जातो हे कळत ही नाही, अशावेळी अपत्यांनी काठी म्हणून आधार देणे अपेक्षित असताना काही वृद्धांच्या नशिबी मात्र वेगळीच व्यथा लिहिलेली असते.

संपूर्ण कुटुंबाचा व समाजाचा आधारवड असलेल्या जेष्ठांना त्यांचे अपत्य व नातेवाईकांचे कडून घरातून बाहेर काढणे, त्यांना वाऱ्यावर सोडणे, त्यांचा सांभाळ न करणे, त्यांना मिळकती मधून बेदखल करणे अशा अपराधांना प्रतिबंध करून आई–वडील व ज्येष्ठ नागरिकांना सन्मानपूर्वक जीवन जगता यावे याकरिता शासनाकडून आई–वडील व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम, २००७ हा कायदा करण्यात आला आहे.

नमूद कायद्यानुसार जेष्ठांना त्यांच्या अपत्य व नातेवाईक यांची कडून होणारा त्रासाला वाचा फोडण्यासाठी तसेच ज्येष्ठांना उपजीविका चालावी म्हणून निर्वाह भत्ता मंजूर करण्यासाठी न्यायाधिकरण म्हणून जेष्ठ नागरिक राहत असलेल्या ठिकाणचे उपविभागीय अधिकारी (डउम्/प्रांताधिकारी) हे नियुक्त केलेले असतात. जेष्ठ नागरिक यांनी त्यांचे तक्रारीबाबत उपविभागीय अधिकारी (डउम् /प्रांताधिकारी) यांचे कडे अर्ज केल्यास त्यांचे कडून संबंधित नातेवाईक यांना समन्स काढून ज्येष्ठ नागरिकांना निर्वाहता मंजूर करतात. न्यायाधिकरणाच्या निर्वाह भत्ता देण्याच्या आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित आरोपीस कारावास किंवा द्रव्य दंड होऊ शकतो.

अडचणीत आलेल्या ज्येष्ठांना योग्य वेळी मार्गदर्शन मिळत नाही त्यामुळे कायदेशीर तरतुदी व त्यांचा हक्क अधिकार असताना देखील ते अडचणींचा सामना करीत जीवन व्यतीत करीत असतात. जेष्ठ नागरिकांना योग्य वेळी समुपदेशन व मार्गदर्शन मिळून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी श्री सोमय मुंडे,पोलीस अधीक्षक, लातूर यांच्या संकल्पनेतून जेष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सदरचा कक्ष भरोसा सेल, पोलीस अधीक्षक कार्यालय लातूर येथे सुरू करण्यात आला असून सदर कक्षामध्ये जेष्ठ नागरिक व त्यांचे नातेवाईक यांना बोलावून समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात येते. तसेच ज्येष्ठ नागरिकांना निर्वाह भत्ता मिळण्यासाठी प्रस्ताव तयार करून संबंधित न्यायाधीकरणाकडे पाठविण्यात येतो. जेष्ठ नागरिक कक्ष सुरू झाल्या पासून एकूण १६ तक्रारी अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ९ अर्ज निकाली काढून उर्वरित अर्जावर सुनावणी चालू आहे.

याशिवाय जेष्ठ नागरिकांना त्यांच्या अडचणी किंवा कायदेशीर मदत, मार्गदर्शन हवे असल्यास त्यांनी भरोसा सेल पोलीस अधीक्षक कार्यालय लातूर येथे संपर्क करण्याचे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## .शालेय शिक्षण अभ्यासक्रमात मनस्मृतिचे श्लोक समाविष्ट न करण्याबाबत भारतीय बौद्ध महासभा कांदिवलीतील दामूनगर शाखा वतीने जनजागृती व सह्यांच्या मोहिम



मुंबई /शहामत शेख :– महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी शालेय शिक्षण अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक सामावेश करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने दिलेला आहे .भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे ते हिंदू, मुस्लिम शीख ईसाई ,जैन , पारसी बौद्ध सर्व धर्मीय लोक वास्तव्य करतात. परंतु हे मनुवादी सरकार भारतीय संविधान नष्ट करून पुन्हा या देशात मनस्मृती ची अंमलबजावणी करण्याचे षडयंत्र करत आहे. या अभ्यासक्रमात मनस्मृती सह सर्व अभ्यासक्रमाचे पुस्तक ज्यात मनुवादी साहित्य छापले आहे . डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनस्मृति दहन केले होते. पुन्हा एकदा मनस्मृतीचा उदो उदो करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी घेतला आहे तसा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या विभागास दिलेला आहे म्हणून भारतीय बौद्ध महासभा कांदिवली दामूनगर शाखा यांच्या वतीने सह्यांचे मोहीम व जन जागृतीचे आयोजन करण्यात आले .यास जनतेकडून चांगला प्रतिसाद लाभला. तसेच मनस्मृतिप्रताची कार्यकर्त्यांच्या वतीने सायंकाळी सात वाजता होळी करण्यात आली. सदर कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धचार्य भाऊराव काळे, उजाला फाउंडेशन अध्यक्ष पंडित कोकणे, तसेच उत्तर मुंबई जिल्हा अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी प्रकाश आहिरे, उत्तर मुंबई जिल्हा युवा अध्यक्ष अजय रोकडे मुंबई उपाध्यक्ष राजा भालेकर सह पत्रकार संजय बोर्डे ड लक्ष्मण रेड्डी, गणेश नरवडे सर, बबन खरात,पत्रकार शहामत शेख, विजय लांडगे, राहुल ढगे,गंगुबाई पटेकर, कचरू पाईकराव, जयसिंग तलवारे,गायिका मंदाताई, वाघमारे,सुरेश गंगावणे मोहन खंदारे,रमेश मस्के,विनायक काळे यांच्यासह बऱ्याच कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

## तर निकाल एक्झिट पोलच्या विरुद्ध लागतील : प्रतिभा सिंह

शिमला : हिमाचल प्रदेशच्या काँग्रेस प्रदेशाध्यक्षा आणि मंडी लोकसभा मतदारसंघातील विद्यमान खासदार प्रतिभा सिंह यांनी म्हटले आहे की ईव्हीएमएध्ये छेडछाड झाली नसेल तर लोकसभा निवडणुकीचे निकाल एक्झिट पोलच्या विरुद्ध लागतील आणि देशात इंडिया आघाडीचे सरकार स्थापन होईल, असा दावा सिंह यांनी केला.

राज्यातील चारही लोकसभा आणि सहा विधानसभा निवडणुकांचे निकालही काँग्रेसच्या बाजूने लागतील, असे त्यांनी म्हटले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ४०० पार करण्याचा नारा फसला असून भाजपला २०० चा आकडाही पार करता येणार नाही, असे ही त्या म्हणाल्या.

भाजपने निवडणुकत जनतेच्या मुद्द्यांवर चर्चा केली नाही.

# लातूर ऑर्थोपेडिक असोसिएशनचा पदग्रहण सोहळा थाटात अध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार; सचिव डॉ.संतोष माळी

लातूर : महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या लातूर ऑर्थोपेडिक असोसिएशनचा पदग्रहण सोहळा हॉटेल कार्निव्हल रिसॉर्टमध्ये रविवारी ( दि. २ जून ) थाटात पार पडला. असो.चे नूतन अध्यक्ष म्हणून डॉ. अशोक पोद्दार; सचिव डॉ.संतोष माळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पदभार स्विकारला . या पदग्रहण सोहळ्यास पुण्याच्या संचेती हॉस्पिटलचे ख्यातनाम अस्थिशल्य चिकित्सक डॉ. पराग संचेती, महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रदीप कोठाडिया, कार्यकारिणी सदस्य डॉ. राहुल पंडित , डॉ. देवेंद्र पालीवाल, डॉ. कुकाले, एमसीआय चे माजी सदस्य तथा सीपीएस मुंबईचे माजी अध्यक्ष डॉ. गिरीश मैंदरकर , विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, आयएमएचे अध्यक्ष डॉ. उमश कानडे, माजी अध्यक्ष डॉ. द्वारकादास तापडिया, प्रेसिडेंट इलेक्ट डॉ. गिरीश कोरे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत लातूर ऑर्थोपेडिक असो.च्या पुढीलप्रमाणे नूतन पदाधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारला. अध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार, सचिव डॉ.संतोष माळी ,उपाध्यक्ष डॉ. चेतन जाजू, डॉ. रणजित हाके पाटील, सहसचिव डॉ. तुषार पिंपळे, डॉ. रोहन अकोसकर, कोषाध्यक्ष डॉ. मन्सूर भोसगे ,अकॅडमिक को– ऑर्डिनेटर्स डॉ.आशिष चलवदे, डॉ. शशिकांत कुकाले, डॉ. निलेश देशमुख, डॉ. विक्रम सूर्यवंशी, डिजिटल अँड मिडिया को– ऑर्डिनेटर डॉ. किरण गोजमगुंडे, डॉ. श्रीनिवास संदीकर, डॉ. मधुसूदन बियाणी, डॉ.अतुल उरगुंडे, एमएमसी / एमओए को–ऑर्डिनेटर डॉ. खालेद काझी, डॉ. हनुमंत चांडक, डॉ. हृषिकेश नळवदे, डॉ. इमरान कुरेशी, पॅट्रॉन्स डॉ. डी.जी. देशपांडे, डॉ. श्रीकांत गोरे, डॉ. जी.ए. हाजगुडे, डॉ. आर.जी. मालू, डॉ. अरुणकुमार राव, डॉ. सतीश देशमुख, डॉ. राजकुमार दाताळ , उदगीर प्रतिनिधी डॉ. श्रीनिवास बलशेटवार , डॉ.अजय महिंद्रकर, अहमदपूर प्रतिनिधी डॉ. वैभव रेड्डी, डॉ. सुनील चलवदे, निलंगा प्रतिनिधी डॉ. तात्यासाहेब देशमुख, अंबाजोगाई प्रतिनिधी डॉ. दीपक लामतुरे, डॉ. निलेश तोष्णीवाल, उमरगा प्रतिनिधी डॉ. राजकुमार कानडे, डॉ. सचिन विश्वेकर. या पदाधिकाऱ्यांनी डॉ. पराग संचेती यांच्यासमोर ' मी ईश्वरसाक्ष शपथ घेतो की, मी संघटनेची तत्वे कसोशीने पाळीन. संघटनेचे हित माझ्यासाठी सर्वोच्च राहील. घटनेमध्ये दिलेल्या मी करावयाच्या सर्व कामांची मी माहिती करून घेईन. संघटनेच्या कामकाजासंबंधित आवश्यक ती मला प्राप्त होणाऱ्या सर्व माहिती, ज्ञान व कागदपत्रांबाबत मी गुप्तता बाळगेन . मी संघटना व तिचे सदस्य यांच्या भल्यासाठी सतत कार्यरत राहीन', अशी शपथ घेतली.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. पराग संचेती यांनी ऑर्थोपेडिक असो.च्या आपल्या ३३ वर्षांच्या प्रदीर्घ कार्यकाळात एवढा उत्कृष्ट पदग्रहण सोहळा कधीच पाहिला नसल्याचे सांगितले. लातूर ऑर्थोपेडिक असो.चे अध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार यांच्या अध्यक्षतेखाली असोसिएशनचे कार्य अत्यंत नेत्रदीपक व उल्लेखनिय होणार आहे, याबद्दल आपल्याला विश्वास असल्याचे त्यांनी बोलून दाखविले. डॉ. कोठाडिया यांनी डॉ. पोद्दार व त्यांच्या नूतन सहकाऱ्यांचे अभिनंदन करून लातूरला मराठवाडा पातळीवरील विभागीय परिषद आयोजित करा, आपण त्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करू असे आश्वासन दिले. डॉ. राहुल पंडित , डॉ. उमेश कानडे, डॉ. गिरीश मैंदरकर , डॉ. उदय मोहिते यांनीही नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. डॉ. अशोक पोद्दार यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना सर्वांच्या सहकार्याने लातूर ऑर्थोपेडिक असो.च्या यशाचा आलेख आपण पुढील काळातही असाच चढता कसा राहील यासाठी प्रयत्नशील राहू असे सांगितले. यासाठी ऑर्थोपेडिक क्षेत्रातील आपला २५ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव नक्कीच कामी येणार असल्याचे सांगून डॉ. पोद्दार यांनी पुढीलवर्षी आपण विविध सांस्कृतिक व आरोग्यविषयक उपक्रम राबविणार आहोत तसेच यावर्षीपासून स्व. डॉ. जगदीश अग्रोया व स्व. डॉ. रामेश्वर कांदे यांच्या स्मरणार्थ पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अवॉर्ड देण्यात येणार असल्याचे जाहीर केले. लातूर ऑर्थोपेडिक असो. चे काम जागतिक पातळीवर घेऊन जाण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू असेही डॉ. पोद्दार यांनी सांगितले. त्यासोबतच सीएमई च्या आयोजनावर भर देणार आहोत. याकरिता आपल्याला सर्वांची भक्कम साथ मिळेल असा विश्वासही डॉ. पोद्दार यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव डॉ. संतोष माळी यांनी केले.




प्रास्तविकात त्यांनी असो.च्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. मागच्या वर्षी असो.च्या वतीने राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती डॉ. द्वारकादास तापडिया यांनी दिली. डॉ. अशोक पोद्दार यांच्या या निवडीबद्दल राज्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे, आ. धीरज देशमुख, आ. विक्रम काळे, माजी आमदार वैजनाथ शिंदे, वैशालीताई देशमुख, डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, समस्त जैन समाजासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. तुषार पिंपळे, डॉ. रोहन अकोसकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. चेतन जाजू यांनी केले. कार्यक्रमास डॉ. डी.जी. देशपांडे, डॉ. राजेंद्र मालू, डॉ. अरुण राव, डॉ. दीपक गुगळे, डॉ. शिवाजी काळंगे, डॉ.सतीश बिराजदार, डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. चेतन सारडा, जितेश बजाज यांसह मान्यवरांची उपस्थिती होती.

## न्यू इंग्लिश स्कुलची सलग १३ वर्षे १००% निकालाची यशस्वी वाटचाल

गुहागर :– पाटपन्हाळे एज्युकेशन सोसायटीचे न्यू इंग्लिश स्कुल पाटपन्हाळे या इंग्रजी माध्यम शाळेने सलग तेराव्या वर्षी ही सन २०२३–२४ दहावीचा निकाल चा १००% देत आपल्या १००% निकालाची परंपरा अबाधित ठेवली आहे. यंदा सन २०२३–२४ या शैक्षणिक वर्षात न्यू इंग्लिश स्कुल, शृंगाळतळीचे आदर्श कर्मचारी व बौद्धजन सहकारी संघाचे चेअरमन विश्वनाथ बाबू कदम यांच्या सुकन्या कु. स्वराली विश्वनाथ कदम हिने ९१.६०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर सिया मुनिष जैतपाल ८४.८०% गुण मिळवित द्वितीय क्रमांकाची मानकरी ठरली तसेच आर्या गणेश मोरे हीने ८२.६०% गुण मिळवित तृतीय क्रमांकावर आपलं नाव कोरले.



शैक्षणिक वर्षे २०२३–२४ चा निकाल पाहता गुहागर तालुक्यातील बौद्ध समाजातील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी भरघोस टक्केवारी मिळवित मोठे यश संपादन करीत १००% निकाल लावला आहे त्यात कु. स्वराली विश्वनाथ कदम हीने समाजातून तालुका पातळीवर सर्वाधिक टक्केवारी मिळवित यशाचे शिखर पादाक्रांत केले. सदर सर्वच गुणवंत विध्यार्थ्यांचे समाजातील सर्वच स्तरातून गुणगान होत आहे. पाटपन्हाळे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष भालचंद्र चव्हाण, उपाध्यक्ष सुचित्राताई वेल्हाळ, सचिव सुधाकर चव्हाण, खजिनदार सुजाताताई चव्हाण, मुख्याध्यापिका रचना सौंदेकर (पुगांवकर) तसेच संचालक मंडळ, शिक्षिका शिर्के मॅडम, जैतपाल मॅडम, शिक्षकवृंद शिक्षकेत्तर कर्मचारी, सर्व गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक यांचे बौद्धजन सहकारी संघ गाव व मुंबई शाखेच्या वतीने कौतुक करण्यात आले व त्यांना पुढील वाटचालीकरता शुभेच्छा देण्यात आल्या.

## चंदनाच्या झाडांची अवैध तोड करून साठा करून ठेवलेले १३० किलो चंदन व एक स्कार्पिओ सह ७ लाख ४० हजारा मुद्देमाल जप्त.. स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांची कारवाई.

लातूर :– चंदनाच्या झाडांची अवैध तोड करून साठा करून ठेवलेले १३० किलो चंदन व एक स्कार्पिओ सह ७ लाख ४० हजारा मुद्देमाल जप्त.... या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक लातूर मा.श्री. सोमय मुंडे यांनी अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याकरिता जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी व ठाणे प्रमुखांना आदेशित केले होते. त्या अनुषंगाने अप्पर पोलीस अधीक्षक श्री अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. संजीवन मिरकले यांचे मार्गदर्शनात दि. ०२/०६/२०२४ रोजी रात्री २०.०० वा. सुमारास स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, मोजे अंबुलगा बु येथे पांढऱ्या रंगाच्या स्कार्पिओ गाडीमधून प्रतिबंधीत व संरक्षित चंदन वृक्षाची लाकुड चोरी करुन चोरटी विक्री करण्यासाठी घेवुन जात आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक श्री संजीवन मिरकले यांनी स्थानिक गुन्हे शाखा येथील सपोनी प्रवीण राठोड व पोलीस हवालदार चंद्रकांत भिमराव डांगे, नवनाथ हासबे, माधव बिलापट्टे, मोहन सुरवसे पोलीस अंमलदार तुराब पठाण यांचे पथक तयार करून त्यांना मार्गदर्शन व सूचना देऊन रवाना केले.

सदर पथकाने नमूद ठिकाणी सापळा लावला तेव्हा रात्री २१.३० वा. सुमारास मौजे अंबुलगा बु येथे सचिन शिवदास माने हा घरासमोर गाडीमध्ये चंदनाचे लाकडे घेऊन विक्री करण्यासाठी जात आहे. खात्रीशीर माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखा पोलीस पथकाने स्कार्पियो क्रमांक एम एच २४ ए डब्ल्यू ९३४० गाडीची तपासणी केली असता गाडीमध्ये मागील बाजूस वृक्षतोड करण्यासाठी प्रतिबंधित व संरक्षित चंदनाची साल काढून तसलेला चंदनाचा गाभा दोन पोते लाकडे व धपसालीकडे असलेले लाकडे मिळून आले.

सदर इसमास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव सचिन शिवदास माने वय २९ वर्ष रा. अंबुलगा बु ता. निलंगा जि. लातुर असे असल्याचे सांगुन त्याने वेगवेगळ्या ठिकाणाहुन आलेला माल तो त्याचे स्वतःच्या घरासमोर ठेवत असल्याची माहिती दिली.

वरील कारवाई १३० किलो चंदन अंदाजे किंमत ३ लाख ४० हजार रुपये आणि स्कार्पिओ वाहन असे एकूण ७ लाख ४० हजार रुपयेचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.* स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अमलदार चंद्रकांत भिमराव डांगे यांचे फिर्यादीवरून पोलीस स्टेशन औराद शहाजानी येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक २१०/२०२४ कलम ३७९, ३४ भादवी, कलम ४१ ४२ भारतीय वन अधिनियम १९२७ व कलम ०४ महाराष्ट्र वृक्ष तोड अधिनियम प्रमाणे आरोपी नामे १) सचिन शिवदास माने पत्ता: अंबुलगा बु ता निलंगा, लातूर यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील चंदनाचे मुद्देमाल कुठे वाहतूक केला जातो. त्याबद्दल अधिक तपास करण्यात येत आहे.

# भाई लोंढे यांच्या आई निवासस्थानी बुद्धवंदना व २२ प्रतिज्ञा कार्यक्रम संपन्न

बीड / प्रतिनिधी :– भारतीय धम्म महासंघ शाखा बीडच्या वतीने आयुष्यमान भाई लोंढे यांच्या हाऊसिंग सोसायटी, बीड येथील आई निवासस्थानी १ जून २०२४ रोजी मंगलमैत्री प्रार्थना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, थोर तत्ववेत्ते अण्णाभाऊ साठे, सम्राट अशोक यांच्या प्रतिमांना भाई लोंढे व त्यांच्या सहचारिणी सविता लोंढे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले . तसेच त्यांच्या भगिनी उषाताई लोंढे यांनी दीप प्रज्वलन केले. त्यानंतर बौद्धाचार्य धर्मराज मजमुले व आठवले साहेब यांचे सोबत उपस्थितांनी सामूहिक बुद्धवंदना , त्रिशरण, पंचशील घेतले. ॲड. चंद्रवदन जाधव यांनी २२ प्रतिज्ञा दिल्या, भिवाजी जोगदंड यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन केले, दत्ता कसबे यांनी मंगलमैत्री प्रार्थना घेतली, एस .एम. जोगदंड, भाई लोंढे, उषाताई लोंढे, ॲड .चंद्रवदन जाधव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी वैशाली गडसिंग , कोमल गडसिंग, नैतिक नारायण थोरात , प्राची विजय सोनवणे या दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच उषाताई लोंढे यांना त्यांच्या एक जून या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करून शुभेच्छा दिल्या. शेवटी शरणात्तय घेण्यात आले . दानपारमितेचे अनुसरण म्हणून लोंढे परिवारांकडून खीरदान करण्यात आले . यावेळी शोभा गडसिंग , मीना वालेकर , मीनाक्षी घोडके , ॲड वर्षा दळवी , ॲड .मनिषा दळवी , विक्रम गवळी , निर्मला गवळी , संचिता लोंढे , गौतमी लोंढे , इ . उपस्थित होते .

# दुसर्याला आनंद देणाऱ्या माणसाला आशीर्वाद रूपी फलश्रुती मिळते

– उत्तमराव तरकसे जुन्नर बेल्हे पुणे येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचार मंच महाराष्ट्र रत्नागिरी व आम्ही भारतीय सोशल फाउंडेशन बेल्हे ता. जुन्नर जि. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने संत कबीर व राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या संयुक्त जयंती निमित्त रामटेक व्यापारी संकुलाच्या सभागृहात ग्रामीण राज्यस्तरीय कवी संमेलन सोहळा मोठ्या जल्लोषात साजरा झाला सदर कवी संमेलनात महाराष्ट्र राज्याचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी–साहित्यिक : उत्तमराव दासु तरकसे (असरडोहकर) हे आवर्जून उपस्थित राहिले आयोजक समितीच्या वतीने त्यांचा सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. कृतज्ञता म्हणून त्यांनी कविता सादर करत संत कबीर, छत्रपती शाहू महाराज, यांचे विषयी विचार मांडताना *संत कबीर राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या विचाराने दुसर्याला आनंद देणाऱ्या माणसांना आशीर्वादरूपी फलश्रुती मिळत राहते असे मोलाचे विचार मांडून उपस्थित्यांना मार्गदर्शन करत उपस्थित मान्यवराचे व कवी संमेलनात उपस्थित कवी साहित्यिकांचे व स्त्रोत्यांचे मनापासून ऋणातच राहणे पसंत केले. कार्यक्रमास निमंत्रित मान्यवर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. डॉ. ख. रा. माळवे (ज्येष्ठ साहित्यिक) प्रमुख पाहुणे मा. रघुवीर खेडकर (अध्यक्ष तमाशा पंढरी महाराष्ट्र राज्य), मा. बाळासाहेब सोनवणे, बेल्हेकर मा. श्री राजेंद्र सेट पिंगट उपसरपंच बेल्हे, मा. मनोज जाधव (संस्थापक अध्यक्ष डीबीए), मा. श्रीमती भावना खोब्रागडे (सह संस्थापक, अध्यक्षा डीबिए), मा. विजय गुंजाळ (सदस्य ग्रामपंचायत गळेजवाडी), मा. अल्पेश सोनवणे



(अध्यक्ष आम्ही भारतीय सोशल फाउंडेशन) अशे वेगवेगळ्या विषयात प्राविण्य आसलेले मान्यवर विचार मंचावर उपस्थित होते त्यांनी आपले मोलाचे विचार मांडून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात उपस्थित ४० कवींनी सहभाग नोंदवला असून त्यांनी आपल्या भारदार आवाजात व जोशात कविता सादर केल्या नंतर सर्व उपस्थित कविना आयोजकामार्फत सन्मानपत्र व सन्मान चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. सतीश शिंदे यांनी खूपच उत्कृष्टपणे सादर केले तसेच कार्यक्रम समितीचे अध्यक्ष मा. अल्पेश सोनवणे यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे व कवी साहित्यिकांचे व सभागृह फुलून गेलेल्या सर्व सभागृहातील प्रेक्षक स्त्रोत व रशिकजनांचे आभार मानून कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.

## लातूर लोकसभा मतदारसंघ मतमोजणीची आकडेवारी मिळणार जिल्हा माहिती कार्यालयाच्या सोशल मिडिया अकाऊंटवर

## नागरिकांनी मतमोजणी केंद्र परिसरात गर्दी न करण्याचे आवाहन

लातूर : – लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या ४ जून रोजी होणाऱ्या मतमोजणीसाठी जिल्हा निवडणूक प्रशासन सज्ज झाले आहे. बार्शी रोडवरील शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन येथे मतमोजणी होत असून सध्याच्या उष्णतेचे प्रमाण अधिक असल्याने नागरिकांनी याठिकाणी गर्दी करू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. मतमोजणीची प्रत्येक फेरीनिहाय सविस्तर आकडेवारी तत्काळ जिल्हा माहिती कार्यालयाच्या एक्स (ट्विटर) हँडल, फेसबुक पेजवरून प्रसारित केली जाणार असून यामाध्यमातून नागरिकांना मतमोजणीची आकडेवारी प्राप्त करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. लातूर लोकसभा मतदारसंघातील मतमोजणीला सकाळी ८ वाजता सुरुवात होणार आहे. त्यानंतर अर्ध्या ते पाऊणतासात पहिल्या फेरीचा निकाल येणे अपेक्षित आहे. तसेच पुढील प्रत्येक फेरीचा निकाल दर २० मिनिटाने येणे अपेक्षित आहे. प्रत्येक फेरीमध्ये सर्व उमेदवारांना मिळालेल्या मतांची सविस्तर आकडेवारी त्या–त्या वेळी जिल्हा माहिती कार्यालयाच्या या फेसबुक पेजवर, तसेच या एक्स अकाऊन्टवरून प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी मतमोजणी केंद्राबाहेर उन्हामध्ये गर्दी न करता घरी बसून मतमोजणीबाबतची माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# जून महिन्याच्या पहिल्याच दिवशी इंटरसिटी रद्द

किनवट / शेख शौकत :– आदिलाबाद ते नांदेड इंटरसिटी ऐनवेळी रद्द होणे व उशिराने धावणे ही समस्या नेहमीचीच झाली आहे. मे महिन्यात तीन दिवस, तर जून महिन्याच्या पहिल्याच दिवशी म्हणजे १ जून रोजी ही इंटरसिटी रेल्वे प्रशासनाने रद्द करून प्रवाशांची हेळसांड केली आहे. तिरुपती ते आदिलाबाद या कृष्णा एक्स्प्रेसवर आदिलाबाद ते नांदेड ही इंटरसिटी अवलंबून आहे. कृष्णा एक्स्प्रेस हीसुद्धा प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरू लागली आहे. मे महिन्यात १३ व १४ आणि २५ तारखेला इंटरसिटी गाडी ऐनवेळी रद्द करण्यात आली होती, तर जून महिन्याच्या आरंभी म्हणजे १ जून रोजीसुद्धा आदिलाबाद ते नांदेड ही इंटरसिटी रद्द करण्यात आली. इंटरसिटी रद्द करणे व उशिराने धावणे यामुळे आदिलाबाद ते नांदेड या रेल्वे मार्गावर इंटरसिटीने किनवट, बोधडी, इस्लापूर, हिमायतनगर, भोकर रेल्वे स्थानकावरून



प्रवास करणारे प्रवासी मेटाकुटीला आले आहेत. इंटरसिटी रद्द होण्याला व उशिराने धावण्याला काही मर्यादा आहेत की नाही? असा सवाल उपस्थित करून कृष्णा एक्स्प्रेसवर अवलंबून न राहता रेल्वे प्रशासनाने स्पेशल १७ डब्याची इंटरसिटी गाडी चालवावी नसता इंटरसिटी बंदच करावी, अशी संतप्त प्रतिक्रिया काही प्रवाशांनी व्यक्त केली आहे.

# लोकनेते विलासराव देशमुख राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेस राज्यातून खेळाडूंचा मोठा प्रतिसाद..

लातूर :– लोकनेते स्व.विलासराव देशमुख यांच्या ७९ व्या जयंती निमित्त मनोधैर्य सेवाभावी संस्था, लातूर संयुक्त विद्यमाने लातूर जिल्हा बुद्धिबळ संघटना, व राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर(स्वायत्त) च्या यांच्या वतीने लोकनेते विलासराव देशमुख चेस चॅम्पियनशिप –२०२४ एकदिवसीय (खुल्या )जलदगती राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धाचे दि. २ जून रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय येथे सकाळी १०:३०वाजता शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. महादेव गव्हाणे सर,व लातूर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव, ॲड. बळवंत जाधव यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले या स्पर्धेत प्रथम पारितोषिक,ओम लमखाने व द्वितीय पारितोषिक, विशाल पटवर्धन, तर तृतीय पारितोषिक,आदित्य सावळकर यांनी पटकाविले. स्पर्धेच्या उदघाटन सत्राला लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष, ॲड. किरण जाधव, ॲड. समद पटेल,कैलास कांबळे, इम्रान सय्यद,ॲड. अर्जुन जाधव,यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेसाठी मुंबई, पुणे, सातारा, अहमदनगर, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद,नांदेड,अकोला, धुळे,आदी जिल्ह्यातून १२०स्पर्धेकानी या स्पर्धेत भाग घेतला होता लोकनेते विलासराव देशमुख राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेच्या एकूण ७फेऱ्या होऊन यातील प्रथम क्रमांक येणाऱ्या स्पर्धेकाला ११०००तर द्वितीय, ७०००व



तृतीय, ५०००बक्षीस व एकूण आकर्षक बक्षीसे ३०व चषक २०जिंकलेल्या स्पर्धाकांना देण्यात आले खुल्या गटा मध्ये चौथा पारितोषिक,निहान पोहने, पाचवा ,अभिषेक पाटील,सहावा,विनीत धूत,सातवा, संदेश बजाज,आठवा,विहान देशमुख,नऊवा,पुष्कर डोंगरे,दहावा,मयूर गुप्ता,अकरावा,चिन्मय रसाळ,बारावा,विवेक रामटेके,तेरावा,आकाश कोळी,चौदावा,राहुल शिंदे,पंधरावा,अक्षत कलंत्री स्थानिक सर्वात्तम खेळाडूचा बहूमान प्रशांत पिसे,समर्थ पाटील, धिरज उपाडे यांनी पटकविला तर महिलामध्ये सविता गोरे,दिक्षा सोनवणे,स्वराली भुरे सर्वात्तम खेळाडू चा बहुमान पटकविला १४वर्ष वयोगटात श्रेयश कुदाळे,आशिष मोटे,राघव भांदर्गे १०वर्ष वयोगटात यश चव्हाण,वेदांत पेंडकर,श्लोक चौधरी तर सर्वात्तम अनुभवी खेळाडू म्हणून, चंद्रकांत पवार,शरद नाईक,व विजयकुमार उपासे यांनी बहुमान पटकावला. लोकनेते विलासराव देशमुख चेस चॅम्पियनशिप –२०२४ एकदीवसीय (खुल्या)जलदगती राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा मनोधैर्य सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष.गायकवाड पवनकुमार व उपाध्यक्ष. शेख सिराज यांच्या पुढाकारातून पार पडली असून या स्पर्धा मध्ये माजी उपमहापौर. कैलासजी कांबळे,माजी नगरसेवक. इम्रान सय्यद,शेख सज्जाद,शेख असलम,शेख इरफान,शेख फारुख,शेख महंमद,डी. उमाकांत,शेख खाजपाशा,सचिन वाघमारे, आकाश मगर,चाऊस असलम,इलियाज शेख, शेख नय्युम, शेख जब्बार,संजय सुरवसे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परीश्रम घेतले..

# दुध सेवन हि अस्सल भारतीय संस्कृती - कुलगुरू डॉ नितीन पाटील

नागपुर :– दुध सेवन हि अस्सल भारतीय संस्कृती असून दुधाचे मानवी आरोग्याचे दृष्टीने अनन्य साधारण महत्व आहे त्यामुळे आरोग्यदायी जिवन जगण्यासाठी प्रत्येकाने दुधाचे सेवन करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापिठाचे कुलगुरू डॉ नितीन पाटील यानी केले. ते विद्यापीठाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त जागतीक दुध दिवसाचे औचित्य साधून आयोजित दुध जागरुकता अभियानाच्या शुभारंभ प्रसंगी बोलत होते. सदरील कार्यक्रमात प्रमुख पाहूणे म्हणून संशोधन संचालक डॉ नितीन कुरकुरे, अभियानाचे संयोजक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ अनिल भिकाने व मुख्य वक्ते तथा अधिष्ठाता दुग्ध तंत्रज्ञान डॉ प्रशांत वासनिक उपस्थित होते. प्रास्तविक पर भाषणात या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे संयोजक तथा संचालक विस्तार शिक्षण डॉ अनिल भिकाने यानी दुध प्या दिर्घायुषी व्हा! या टॅग लाईन खाली राज्यभर दुध जागरुकता अभियान हे पुढील वर्षभर राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. या अभियानाचा मुख्य उद्देश अलिकडील काळात दुधा बद्दल लोकामध्ये निर्माण झालेले गैरसमज दुर करून तसेच फास्ट फुडकडे वळलेल्या तरुणाईस दुधाचे महत्व सांगून राज्यात दुधाचे सेवन वाढण्यासाठी जागरुकता निर्माण करणे असल्याचे सांगीतले. राज्यात दर डोई दुधाचे सेवन हे ३२९ ग्रॅम असून देशाच्या सरासरी ४५९ ग्रम पेक्षा खूप कमी असल्याचे सांगीतले . दुधाचे सेवन वाढले तर दुध दर वाढीस चालना मिळून दुध उत्पादन वाढीस चालना मिळून शेतकरी आर्थिक दृष्ट्या सक्षम होईल. या प्रसंगी ऑनलाईन पध्तीने आयोजित कार्यक्रमात





प्रमुख पाहूणे डॉ नितिन कुरकुरे यानी जागतीक दुध दिवसाचा इतिहास सांगून महत्व विषद केले. मुख्य वक्ते दुग्ध तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ प्रशांत वासनिक यानी त्याच्यां भाषणात दुधाचे घटक ,दुधाच्या प्रत्येक घटकाचे मानवी आरोग्यासाठी महत्व व फायदे सांगीतले. गाईच्या व वेगन दुधातील फरक विषद करताना दुधात १३ नैसर्गिक पोषकतत्वे असुन वेगन दुधात ५–१० वनस्पतीजन्य पोषकतत्वे असुन ते उत्पादक कंपनी नुसार त्याचे प्रमाण बदलत असतात. गाईच्या दुधातील स्निग्ध पदार्थ, प्रथिने, विटामीन्स व खनिजे पचनास हलके असुन त्यांचे पोषणमुल्य अधिक असल्याचे सप्रमान सांगितले. ए वन व ए टु दुध हे विपणन धोरण असल्याचे व भारतात उपलब्ध जनावरांचे दुध हे ए टु प्रकाराचे असल्याचे एन.बीए जी आर,करनाल येथील राष्ट्रीय संस्थेनी संशोधनाअंती जाहीर केल्याचे नमुद करुन आपल्याला ए वन दुधाची भिती बाळगण्याची गरज नसल्याचे सांगितले. दुधामुळे जीवनशैलीचे आजार होतात हे मिथक असुन डॉ.मोहन, मधुमेह रोग तज्ञ ,चेन्नई यांच्या संभाव्य शहरी ग्रामीण महामारी विज्ञान अभ्यासगट यांनी पाच महाद्रिपातील ,२७ देशातील जवळपास २ लक्ष लोकांवर सतत २० वर्ष केलेल्या संशोधनाचे निष्कर्षानुसार दुधाच्या नियमित सेवनाने मधुमेह, हृदयरोग व इतर जीवनशैली चे आजारापासुन संरक्षण व पोषण सुधारण्यासोबतच मृत्युदर कमी होतो असे नमुद केले. सदरील व्याख्यानास माफसू अंतर्गत सर्व महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता प्राध्यापक, विद्यार्थी, शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजन समितीचे सचिव डॉ गजानन नारनवरे व डॉ प्रविण बनकर तर आभार प्रदर्शन डॉ सारीपुत लांडगे यानी केले विद्यापिठाअंतर्गत सर्व दहा पशुवैद्यक , दुग्ध तंत्रज्ञान व मत्स्य विज्ञान महाविद्यालये, तिन कृषि विज्ञान केंद्र तसेच संलग्नीत ७२ दुग्ध व्यवस्थापन पदविका शाळातील प्राध्यापक, शास्त्रज्ञ, शिक्षक व विद्यार्थ्यानी राज्यभर सामुहीक दुध सेवन, सेल्फी वुईथ ग्लास ऑफ मिल्क, प्रबोधनपर व्याख्याने, रॅली, प्रकाशने आदी १०० उपक्रम राबवले.

# आदर्श आचारसंहितेचा भंग केल्यास होणार कारवाई

## विना परवानगी मिरवणूक काढणे, बॅनर लावण्यास मनाई

लातूर : – लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता जिल्ह्यात लागू असून या आदर्श आचारसंहितेचे भंग केल्यास संबंधितांवर कडक कार्यवाही करण्यात येणार असल्याचे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे. आदर्श आचारसंहिता काळात विना परवानगी मिरवणूक काढणे, बॅनर किंवा पोस्टर लावण्यास मनाई असून या नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार लातूर लोकसभा मतदारसंघातील मतमोजणी ४ जून २०२४ रोजी होणार आहे. या दिवशी विना परवानगी मिरवणूक काढणे, बॅनर किंवा पोस्टर लावण्यासारखी कृती केल्यास तो आदर्श आचारसंहितेचा भंग समजण्यात येणार असून भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. त्याबाबतच्या सूचना पोलीस प्रशासनाला देण्यात आल्या असून अशा प्रकारे उल्लंघन झाल्यास पोलिसांमार्फत तातडीने कार्यवाही केली जाणार आहे. मतमोजणी केंद्राच्या २०० मीटर परिसरात ४ जून २०२४ रोजी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. त्यामुळे मतमोजणी केंद्राच्या ठिकाणापासून २०० मीटरच्या परिसरामध्ये मंडपे, दुकाने उभारणे, तसेच मोबाईल फोन, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनिक्षेपक व इतर सेट, ध्वनिक्षेपक व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे बाळगण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच निवडणूकीच्या कामाव्यतिरिक्त खाजगी वाहन, संबंधित पक्षाचे चिन्हाचे प्रदर्शन व निवडणूकीच्या कामा व्यक्तीरिक्त व्यक्तीस प्रवेश करण्यासाठी प्रतिबंध करण्यात आला आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE